९६२

(५३)

क्रमांक क्रनि/एल. आर.-१२६-जी-१-८०
पुणे, दिनांक २१-२-१९८०.

प_रि_प_त्र_क_

उपसंचालक भूमि अभिलेख नागपूर, औरंगाबाद, पुणे व मुंबई.
एकत्रीकरण अधिकारी (सर्व)/अधीक्षक भूमि अभिलेख (सर्व).

विषय- एकत्रीकरण आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना भूमि अभिलेख विभागाची अन्य काम देण्याबाबत.

सोबत शासनाकडील महसूल व वन विभाग निर्णय क्रमांक सी. ओ. एन् १०७७/४०५३५/८०६-ल१ दिनांक १९-२-८० ची प्रत यासोबत आपले माहितीसाठी जोडली आहे.

वरील शासनाचे निर्णयानुसार त्यातील परिच्छेद १(अ) ते १(ड)मध्ये नमूद केलेली कामे जमीन एकत्रीकरण योजनेच्या कामासाठी नेमण्यात आलेल्या कर्मचारीवृंदाकडून पूरी करून घ्यावयाची आहे त. सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

अ) प्रत्येक सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनी नविन वर्षासाठी हाती घेतलेल्या जमीन एकत्रीकरण योजनेच्या कार्यक्रमाची एक प्रत त्या जिल्हयाचे जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख व त्या मंडळाचे अधीक्षक भूमि अभिलेख यांना माहितीसाठी पाठविण्याची आहे. ज्या गावात जमीन एकत्रीकरण योजनेचे काम हाती घेतले आहे अशा गावातील भूसंपादन व कोर्टवाटप याचे व्यतिरिक्त शेतकऱ्यांकडून मोजणी फी भरून प्राप्त झालेले अशा गावातील हद्द कायम करण्यासाठी प्राप्त झालेले अर्ज सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचेकडे मोजणीचे नोंदवहीचा क्रमांक दाखल करून दूयावयाचे आहेत. सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनी सदर अर्जाचा निपटारा त्यांचे अधिनस्थ असलेल्या भूमापकाकडून अथवा पोटहिस्सा भूमापकाकडून करून घेण्याचा आहे. सदर अर्जाची नियमानुसार पुर्तता होताच मोजणी प्रकरणे नकाशाचे अक्स प्रतिसह सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांचेमार्फत जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे छाननीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्याचे आहेत. एकत्रीकरण आस्थापनेकडे वर्ग केलेल्या मोजणी अर्जाचा निपटारा वेळे वर करून घेण्याची जबाबदारी सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांची

-२-

असून त्याबाबत संबंधीत एकत्रीकरण अधिकारी यांनी नियंत्रण ठेवण्याचे आहे. मोजणी प्रकरणे वेळेवर एकत्रीकरण आस्थापनेकडे दिली जातील व ती पुर्तता होवून त्याबाबत जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांचेकडून अर्जदारास अंतीम उत्तर वेळेवर दिले जाईल या बाबीकडे अधीक्षक भूमि अभिलेख यांनी नियंत्रण ठेवावयाचे आहे.

ब) जमीन एकत्रीकरण योजनेच्या कार्यक्रमात समाविष्ट केलेल्या गावात जर १९७१ ते १९७४ या कालावधीत दुष्काळी कामानिमित्त शासनाकडून रस्ते, पाझर तलाव, लघुसिंचाई प्रकल्प इत्यादि कामे हाती घेवून ती पूर्णही झाली असतील, परंतु त्यानुसार मोजणी होवून गावचा नकाशा व अभिलेख यांत दुरुस्ती झाली नसल्यास अशा कामाबाबत गावाचे बाबतीत तहसीलदार यांच्याशी संपर्क साधून तलाठी यांचेकडून यादी घेवून अगर त्यामध्ये शासनाचे पूर्वीचे आदेशाप्रमाणे तलाठी यांचेकडून कधी मोजणी होऊन प्रकरण जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांचेकडे प्राप्त झाले असल्यास त्यांचेकडून माहिती घ्यावी व त्या आधारे एकत्रीकरण भूमापक व अधिनस्थ पोटहिस्सा भूमापक यांचेकडून त्यामधील मोजणी काम पूर्ण करून घेवून नकाशा व भूमिअभिलेख याबाबत पुर्तता करावयाची आहे. अशा गावात पूर्वी भूसंपादनाचे कामी अशा प्रकरणाचे बाबतीत मोजणी व दुरुस्ती नोंदवही यांत प्रकरणे दाखल करून त्यांची प्रगती नोंदवहीत अद्यावत ठेवण्याची जबाबदारी जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख यांची असून कामाचे निपटाऱ्यावर एकत्रीकरण अधिकारी व अधीक्षक भूमि अभिलेख यांनी नियंत्रण ठेवण्याचे आहे.

क) गांवी सार्वजनिक उपयोगासाठी जे सरकारी रस्ते, गुरचरणाचे स. नं. दोन गावांतील शिवा अथवा अन्य राखीव सरकारी जागा असतात अशा सार्वजनिक उपयोगासाठी ठेवलेल्या सरकारी जागेवर लगतचे खातेदाराकडून अतिक्रमण होऊन ज्या सार्वजनिक उपयोगासाठी तो वर्ग केली असतात त्या सोयीपासून गावकरी वंचित होतात. एकत्रीकरण योजनेसाठी हाती घेतलेल्या गावातील अशा सार्वजनिक उपयोगासाठी ठेवलेल्या सरकारी जमीनींची प्रथम नजर पहाणी व टेपाने मोजणी करावयाची असून अशा राखीव सार्वजनिक उपयोगासाठी ठेवलेल्या सरकारी जमीनीवर अतिक्रमण झाले असल्याचे आढळून आल्यास, सदर सरकारी जमीन, रस्ता यांचे संबंधात लगतचे सर्वे नंबरसह मोजणी करून अतिक्रमण काढण्याचे कामी प्रकरण तयार करून घेवून सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनी ते एकत्रीकरण अधिकारी यांचेमार्फत संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेकडे पाठविण्याचे आहे. सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी

सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी यांनी दरमहा त्यांचे रोजी शोधीवत सरकारी जमीनीवरील शोधलेल्या अतिक्रमणाचा तपशील देण्याचा असून, एकत्रीकरण अधिकारी यांनी त्याबाबतचे पुढील प्रगतीबाबत नियंत्रण ठेवण्याचे आहे.

(ड) जमीन एकत्रीकरण योजने साठी हाती घेतलेल्या गांवी ताब्याचे काम चालू करण्या पूर्वी एक महिन्याची पूर्वसूचना देवून जर संबंधीत खातेदार स्वखर्चाने हद्द निशाणीचे दगड तयार ठेवून रोवून घेण्याची व्यवस्था करणार असतील तर ते योग्य हद्दीचे ठिकाणी लावण्या बाबत मार्गदर्शन केले जाईल याची खातेदारांना जाणीव द्यावी व त्याप्रमाणे पुर्तता न केल्यास पक्त जागेवर चुन्याची खूण केली जाईल व यथावकाश तहसीलदार यांचे बांधपहाणीचे कार्यक्रमानुसार सदर गांव त्यावेळी हाती घेतले जाईल याची जाणीव द्यावी याप्रमाणे ताब्याचेवेळी पुर्तता न झाल्यास तहसीलदार यांना बांधपहाणीचे व हद्द निशाणी रोवण्याचे कार्यक्रमाचेवेळी गटाची हद्द समजण्यास अडचण येत असेल तर एकत्रीकरण आस्थापनेवरील मंडळ निरीक्षक व भूमापक यांची हद्द दाखविण्याचे कामी मदत घ्यावी. मात्र हद्द निशाणीचे दगड खातेदार स्वतः देण्यास तयार नसतील तर त्याबाबतची जी आर्थिक तरतुद करणे व मागणीपत्र व कंत्राटदार ठरविणे इत्यादि सर्व जबाबदारी नेहेमीप्रमाणे महसूल अधिकाऱ्यांचीच राहिल.

भूमि अभिलेख विभागाने करावयाचे दर दिवसाचे विहित परिमाण ठरविण्यात आले असून सदर परिमाणास ( Norms) शासनाची मान्यता मिळालेली आहे. वर नमूद केलेल्या (अ) ते (ड) या कामासाठी विहित परिमाणानुसार जे दिवस खर्च होती त्याचे अनुरोधाने सर्व कर्मचाऱ्यांचे एकूण ३० दिवस खर्ची पडले असतील तर विदर्भ व मराठवाडा विभागात दरमहा ४०० हिश्याचे अनुरोधाने येणारे क्षेत्राची तर पश्चिम महाराष्ट्र विभागात दरमहा ५०० हिश्याचे अनुरोधाने येणारे क्षेत्राची वार्षिक लक्ष्यांत आपोआप सूट मिळाली असे गृहित धरावे याप्रमाणे विहित लक्ष्यात सूट देणे व कार्यक्रमात बाजवी ती दुरुस्ती करण्याचे अधिकार उपसंचालक भूमिअभिलेख यांना देण्यात येत आहे त.

(अ. द. सामंत)
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
भूमि अभिलेख, म. रा. पुणे.

प्रतिलिपी- जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख(सर्व)/सहाय्यक एकत्रीकरण अधिकारी(सर्व)/ कार्यासन अधिकारी जमाबंदी आयुक्त कार्यालयातील सर्व यांचेकडे माहितीकरिता रवाना.

प्रतिलिपी- शासनाकडील महसूल व वन विभाग ( ल१ कार्यासन) यांना त्यांचे निर्णय क्रमांक सीओएन-१०७७/४०५३५/८०६-ल१ दिनांक १९-२-८० चे संदर्भात माहितीसाठी सादर अग्रेषित.

ह/१८२.